# पतसंस्थांच्या शासनाकडून अपेक्षा

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व सहकारी संस्था नियम १९६१ हा सहकारी कायदा महाराष्ट्र राज्यासाठी केवळ लागू आहे. राज्यात २ लाख ७ हजारांच्यावर विविध प्रकारच्या संस्था नोंदणीकृत असून त्यामध्ये १८ हजारांच्यावर नागरी सहकारी पतसंस्था नोंदणीकृत आहेत. या व्यतिरिक्त राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, पगारदार कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतसंस्था, विविध कार्यकारी सोसायट्या, या संस्था महाराष्ट्रातील आम जनतेसाठी आर्थिक बाबीमध्ये फार महत्वाच्या भूमिका बजावीत असतात. या सर्व संस्थांवर उपरोक्त कायद्याच्या आधारे राज्य सरकार दैनंदिनरित्या नियंत्रण करीत असते. पुणे येथील सहकार आयुक्त हे या सर्व सहकारी संस्थांचे प्रमुख म्हणून काम करीत असतात. महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने मंत्रालयात **सहकार सचिव** म्हणून वेळोवेळी शासनाचे विविध आदेश, परिपत्रके, सूचना मा. सहकार आयुक्तांच्या माध्यमातून देत असतात. आणि अशा पध्दतीने सहकारी संस्थांचे राज्य शासन करीत असते.

वरील सर्व वस्तुस्थिती असताना शासनाकडे त्या - त्या स्तरावर प्रशिक्षीत व सहकारातील शिक्षीत अधिकाऱ्यांचा पूर्णपणे अभाव आहे. **राज्यामध्ये सहकारातल्या कुठल्याही अधिकाऱ्यांस संस्थांचा उपविधी व सहकार कायदा याचे संपुर्ण ज्ञान नसल्यामुळे** पुस्तके व प्रथा यांच्या आधारे हे अधिकारी राज्यातील सहकारी संस्थांना प्रत्येक वेळी वेगळा मापदंड लावून मदत,मार्गदर्शन, किंवा सल्ला देण्याऐवजी आर्थिकदृष्टया पिडण्याचे काम जाणीवपूर्वक करताना सर्वत्र दिसत असतात. आणि याची संपूर्ण कल्पना सहकार सचिव, सहकार आयुक्त, राज्याचे मुख्यमंत्री, सहकार मंत्री, सहकार राज्य मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, तालुका पंचायत सदस्य व ग्राम पंचायत सदस्य या सर्वांना पूर्णपणे जाणीव असते. एवढेच नव्हे तर अधिकाऱ्यांच्या माध्यमातुन खुलेआम होत असलेला भ्रष्टाचार जाणीवपूर्वक दुर्लक्षिताना दिसतो. आणि त्यामुळे सहकारात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची सहकार क्षेत्राबद्दलची भुमिका व भावना ही दिवसेंदिवस निराशाजनक होत चालली आहे. **केवळ निवडणूकांच्यावेळी पैशांचे वाटप करून सहकारी कार्यकर्त्यांना खुश केले जावू शकते,** या आतापर्यंतच्या अनुभवामुळे लोकप्रतिनिधी या भ्रष्टाचाराबद्दल काहीही उपाय शोधण्यास तयार नाहीत. तसेच निवडणुकीच्या पूर्वसंध्येला शासनाच्या तिजोरीतून आश्वासनाची खैरात करण्याच्या सवंग कार्यपध्दतीमुळे सर्वसामान्य मतदाराला फसविले जाते. या सर्व गोष्टींमुळेच **सहकाराला १०० वर्ष पूर्ण होवून देखील, सहकारी संस्थांच्या माध्यामातुन सभासदांचे आर्थिक हित जपले गेले, याचा राज्यात कुठेही पुरावा उपलब्ध नाही** आणि त्याला एकमेव कारण जे आहे ते वर सांगितलेली वस्तुस्थिती.

राज्याच्या मुख्यमंत्र्यापासुन, सहकार मंत्री, सहकार सचिव, सहकार आयुक्त यांचेकडे पतसंस्थांचे काय प्रश्न आहेत ? व ते का सोडविण्यात आले नाहीत ? यासाठी गेली ३५ वर्षांहुन अधिक काळ या क्षेत्रामध्ये आमच्यासारखे कार्यकर्ते सतत मागणी करीत असतात. **परंतु शासनास या पतसंस्थांचे जे विविध प्रश्न आहेत ज्यासाठी शासनाला एकही नया पैसा खर्च करावा लागणार नाही, ते सुध्दा प्रश्न सोडविण्याची शासन या क्षणापर्यंत तसदी द्यायला तयार नाहीत.** आणि त्यामुळे अधिकारी आणि त्यांच्या मार्फत पतसंस्थांना लुटण्याचे पापी काम नियमितपणे चालू आहे. आणि हे प्रश्न जर शासनाने सोडविले तर अधिकारी व त्यांच्या माध्यमातून ज्यांना हरामचे पैसे हवे आहेत ते मार्ग बंद होणार आहेत. आणि ह्याच कारणास्तव **जे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाला एकही नया पैसा खर्च करण्याची आवश्यकता भासत नाही. ते प्रश्न सुध्दा शासन सोडविण्यासाठी का पावले उचलत नाही?** पतसंस्थांचे असे कुठले प्रश्न आहेत की शासन

हे  ताबडतोब सोडविल. त्या प्रश्नांची जंत्री सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे. :-

१. संचालकांनी भरून देण्याचे बंधपत्र रद्द करावे.
२. सर्व सहकारी पतसंस्थांचे किमान कार्यक्षेत्र एका संपूर्ण जिल्ह्यापुरते  देण्यात यावे. (उदा. बृहनमुंबई, रायगड, पुणे, वाशीम इत्यादी.)
३. पतसंस्थांची लेखापरिक्षण फी ही नागरी सहकारी बँकां प्रमाणेच आकारण्यात यावी.
४. पतसंस्थांचे संचालक मंडळ बरखास्त करणेपुर्वी फेडरेशनला आपली बाजू प्रत्यक्ष मांडण्यास संधी द्यावी. व फेडरेशन, पतसंस्था व सहनिबंधक यांची संयुक्त बैठक घेवून योग्य तो मार्ग काढण्याचे प्रथम प्रयत्न करावेत.
५. पतसंस्थांचे लेखापरिक्षकांच्या नेमणूका संपूर्ण राज्यात ऑन लाईन कराव्यात.
६. निवडणुकीसाठी संचालकांना भरावे लागणारी अनामत रक्कम रद्द करण्यात यावी.
७. वाहन तारण कर्ज ३ महिन्यापर्यंत थकीत झाल्यास वाहनाचा थेट ताबा घेण्यास संस्थांना परवानगी द्यावी.
८. कलम ४९ चे कर्ज ३ महिन्यापर्यंत थकीत झाल्यास थेट पगार कपात करण्याची तरतुद करावी.
९. राज्यातील पतसंस्थांच्या प्रत्येक फेडरेशनला सहकार खात्याने मेलींग लिस्टवर घ्यावे.
१०. थकबाकीदार कर्जदार व जामीनदार यांना निवडणुकीत मतदान करणे व निवडणुकित भाग घेणेसाठी मज्जाव करणेसाठी कायद्यात त्वरीत योग्य ती दुरूस्ती करावी.
११. अपसेट प्राईज ठरविण्याचे थेट अधिकार त्या त्या पतसंस्थांना देण्यात यावेत.
१२. कलम १०१ चा दावे चालविण्याकरिता परसेवेवर देण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याचे मानधन ठरविण्याचा अधिकार फेडरेशनला देण्यात यावा.
१३. सहकार खात्याचे आवक व जावक रजिस्टर ऑन लाईन करावे.
१४. नागरी सहकारी बँकांप्रमाणे ''ब'' वर्ग सभासदांकडून ठेवी स्विकारण्यास पतसंस्थांना परवानगी द्यावी.
१५. पतसंस्थांचा व्यवसाय कर / आर. टी. ओ. ट्रेड कर रद्द करण्यात यावा.
१६ कलम १०१ व ९१ मध्ये निकाल देण्याची कमाल मर्यादा ३ महिने करावी. कोणत्याही कारणास्तव ह्या नकालास स्थगिती देऊ नये.
१७. विशेष वसुली व विक्री अधिकाऱ्यांना मागताक्षणी पोलिस संरक्षण देण्यात यावे.
१८. प्रत्येक पतसंस्थेचे अधिकृत भाग भांडवल हे किमान ५० लाख रूपये करावे.
१९. पतसंस्थांमध्ये राखीव निधीची तरतुद करण्याचे बंधन २५ टक्क्यावरून १० टक्क्यांवर आणावे.
२०. पतसंस्थांची बाहेरून कर्ज उभारण्याची मर्यादा वाढवावी.
२१. पतसंस्थांमधील रोख रक्कम हाताळणेची मर्यादा पतसंस्थेच्या उलाढालीप्रमाणे वाढवावी.
२२. सर्व पतसंस्थांच्या निवडणूका फेडरेशनच्याच माध्यामातून घेण्यात याव्यात.
२३. पतसंस्थांना इतर उत्पन्नांची साधने वाढीसाठी इतर मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी विविध परवानग्या देण्यात याव्यात
२४. पतसंस्थांविषयी धोरण म्हणून कोणताही निर्णय घेण्यापुर्वी राज्यातील जिल्हा, विभाग व राज्य स्तरीय अशा सर्व फेडरेशनला अधिकृतपणे विश्वासात घ्यावे.
२५. पतसंस्थांचे विलनीकरण करण्यासाठी कायद्यात सूसुत्रता आणावी.
२६. नविन एस. आर. ओ.अधिकारी नेमण्याबाबतचे नियमांमध्ये शिथीलता आणावी.
२७. मयत कर्जदाराचा / जामिनदाराचा कोणताही परवाना नुतनीकरणाचा अधिकार पतसंस्थेस द्यावा.

२८. पतसंस्थांचे लेखापरिक्षण निकष ठरविताना राज्यातील पतसंस्थांच्या सर्व फेडरेशनला प्रथम विश्वासात घ्यावे,व अधिकृतपणे चर्चा करावी.

२९. पतसंस्थांना पोलिस व्हिजीट रजिस्टर नोंद करणेबाबत पोलिस ठाण्यांना निर्देश द्यावेत.

३०. केंद्र सरकारचा माहितीचा अधिकार - २००५ च्या दंडाची रक्कम मध्ये प्रति दिन रूपये २५०/- ऐवजी रूपये १०००/- करावी व गोपनीय अहवालात त्या अधिकाऱ्याचे नाव काळ्या यादीत समाविष्ठ करून त्यास बढती देऊ नये व त्याच्यावर प्रसंगी आय. पी. सी. खाली गुन्हा दाखल करण्याचा अधिकार अपीलीय अधिकाऱ्यास द्यावा.

३१. कलम १०१ व ९१ च्या सुनावणीसाठी यु. पी. सी. मार्फत पाठविण्यात आलेली पत्रे ग्राह्य धरण्यात यावी.

३२. अवसायनात गेलेल्या पतसंस्थांचा निधी त्या त्या कार्यक्षेत्रातील फेडरेशनच्या नावे वर्ग करावा. व फेडरेशनने त्या रकमांचा विनियोग कार्यक्षेत्रातील पतसंस्थांच्या ठरलेल्या धोरणाप्रमाणे उपयोग करावा.

३३. पतसंस्थांच्या वार्षिक सभेची मुदतवाढ मागताक्षणी देण्यात यावी.

३४. अर्जदार व त्याचे जामिनदार कुठल्याही संस्थेचा थकबाकीदार नाही असा दाखला शासनाने देण्याची स्वतंत्र यंत्रणा उभी करावी.

३५. सर्व पतसंस्थांचे सर्व प्रकारचे फॉर्मचे, मसुदे (फॉरमॅट) रजिस्टरर्स, स्वाफ्टवेअर एकसमान असावे.

३६. पतसंस्थांना सभासदाच्या एका भागाची किंमत ठरविण्याचे अधिकार द्यावेत.

३७. सहकार खात्याच्या प्रत्येक कार्यालयातील कोणताही प्रस्ताव मंजूरी वा नामंजूरी ७ दिवसाच्या आत देण्यासाठी ही व्यवस्था सुध्दा ऑनलाईन करावी.

३८. पतसंस्थांना सेक्युटराजेशन ॲक्टमध्ये अंतर्भूत करावे. त्यासाठी कायद्यात योग्य ती दुरूस्त करावी.

३९. शासनाच्या विविध योजनांचे फॉमर्स विक्री करण्यासाठी पतसंस्था व फेडरेशनला परवानगी द्यावी.

४०. पतसंस्थांना फ्रँकीग सुविधा पुरवण्यास परवानगी द्यावी.

४१. संस्थेकडे इमारत निधी जमा असल्यास त्यांना सहकार खात्याच्या विना परवानगी जागा खरेदी करू देण्याचे धोरण जाहीर करावे.

४२. कार्यालयातील अधिकारी आठवड्यातून किमान ४ दिवस पूर्ण वेळ जनतेसाठी कार्यालयात हजर असण्यासाठी योग्य ते निर्देश द्यावेत.

**पतसंस्थांचे जे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाला आर्थिक तरतुद करावी लागेल ते प्रश्न खालीलप्रमाणे** :-

१. अवसायनात गेलेल्या व प्रशासक असलेल्या जिल्हा बँकेच्या थकबाकीदार सहकारी संस्थांसाठी शासनाने पॅकेज जाहीर करून ती रक्कम जिल्हा बँकेकडे वर्ग करावी.

२. राज्यातील पतसंस्थांच्या प्रत्येक फेडरेशनच्या कार्यालयासाठी किमान ५००० स्के. फूट जागा नाममात्र शुल्कावर उपलब्ध करून द्यावी.

३. पतसंस्थांसाठी डीपॉझिट गॅरंटी कारपोरेशन सरकारने स्वतः स्थापन करावे. व त्यासाठी शासनाने १००० कोटी रूपये तुर्त गुंतवावेत.

४. पतसंस्थांना प्रशिक्षण देण्याचे काम राज्य सहकारी संघ व सर्व फेडरेशन्स व्यतिरिक्त कोणत्याही संस्थेस करू देऊ नये.

५. एस. आर. ए. व खाजगी इमारतीमध्ये २० टक्के जागा पतसंस्थांसाठी आरक्षीत करावयात.

. एस. आर. ओ. च्या द्वारे वसूलीतून मिळणाऱ्या रकमेतून पगार, स्टेशनरी, व इतर खच आवश्यक त्या त्या पतसंस्थांना देण्यात यावेत.

६. कलम १०१ / ९१ चा दाखला मिळविण्यासाठी भरावे लागणारे मुद्रांक शुल्क ३ टक्क्यावरून अर्ध्या टक्क्यावर आणावे.

७. शासनाच्या सहकार खात्याच्या सर्व कार्यालयात सी. सी. टीव्ही कॅमेरे बसवावेत व कार्यालये वेळेत सुरू व बंद करावीत.

सरकारने आपले डोके ठिकाणावर ठेवून पतसंस्थांचे वरील सर्व प्रश्न सोडविण्यासाठी ताबडतोब पुढाकार घ्यावा. कारण राज्यातील सर्व पतसंस्थांमध्ये वरील प्रश्नांबाबत जागृकता करण्याची मोहिम आम्ही चालू केलेली आहे. कृपया नोंद घेवून **विषाची परिक्षा पाहु नये** असे विनम्रपणे आवाहन या निमित्ताने करीत आहोत.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**